ePaper म्हणून भुजबळ समाजांमध्ये भांडणं लावण्याचं पाप करतायत": संभाजीराजे छत्रपती

| वर्ष - 7 | अंक - 190 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- द. आफ्रिका पुन्हा 'चोकर्स'!
- रश्मिका नंतर काजोलचा 'डीपफेक'
- उच्चशिक्षित तरुणींना मोफत स्कूटी!
- समाज एकमेकांसमोर उभे राहतात

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 18 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पिंपरी-चिंचवड बांधकामांना पुन्हा परवागनी!

## » फटाके, वाहनांचा धूर, बांधकामांमुळे हवेची पातळी झाली होती धोकायदाक

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या तीन दिवसांत पातळीसह सुधारणा झाली आहे, मागील "गंभीर" पातळीपेक्षा लक्षणीय घट झाली आहे. हे लक्षात घेऊन आणि ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅनचे पालन करून, बांधकाम व प्रक्रियेवरील बंदी याद्वारे मागे घेण्यात आली असल्याचे आदेश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी आज निर्गमित केले आहेत.**

लक्ष्मीपूजन, नरक चतुर्दशीच्या दिवशी शहरातील सूक्ष्म धूलिकणांमध्ये दुप्पट वाढ झाली असून, हवेची गुणवत्ता अत्यंत खालावली आहे. हिवाळ्यात जमिनीवरील धुलिकण हवेत जाऊन हवा प्रदूषित होते. त्यात फटाक्यांची भर पडली आहे. त्यामुळे शहरातील हवेची पातळी धोकादायक श्रेणीत गेली आहे. शहरातील वायू प्रदूषण रोखण्यासाठी पालिकेने ३२ प्रभागांमध्ये १६ वायू प्रदूषण नियंत्रण पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. या पथकांद्वारे प्रभागातील बांधकामस्थळांना भेटी देऊन छायाचित्रे, चित्रफितीद्वारे त्याची नोंद घेण्यात येत आहे.

प्रदूषण नियंत्रण तरतुदींचे पालन न केल्याचे उघड झाल्यास दंड आकारला जात आहे. प्रसंगी नोटीस बजावून कामाची जागा सील केली जात आहे. दैनंदिन वायू प्रदूषण निरीक्षण केले जाते. शहरातील ढाबा, बेकरी, रेस्टॉरंट आणि हॉटेल्स मालकांनी स्वयंपाकघरात पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर करावा. तसेच डिझेल जनरेटरचा वापर करण्याचे शक्यतो टाळावे, असे आवाहन केले आहे.

शहरातील हवेची गुणवत्ता वाढविण्यासाठी उद्योगांच्या वायू प्रदूषणावरही बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. भारतीय उष्ण कटिबंधीय हवामानशास्त्र संस्थेच्या (आयआयटीएम) सफर संकेतस्थळाच्या माध्यमातून ही नोंद झाली आहे. अतिसूक्ष्म धूलिकण (पीएम २.५) आणि सूक्ष्म धूलिकणात (पीएम १०) वाढ झाल्याने शहराच्या काही भागातील हवेची गुणवत्ता चक्क खराब श्रेणीपर्यंत पोचली होती. संकेतस्थळाच्या नोंदीनुसार भोसरी, वाकडमधील भूमकर चौक, निगडी या भागातील हवेची गुणवत्ता सर्वात खराब श्रेणीत नोंदली गेली आहे. फटाक्यांसह अन्य बाबींमुळे ही



"हवा प्रदूषण रोखण्याच्या अनुषंगाने पालिकेच्या वतीने विविध उपाययोजना केल्या जात आहेत. त्याचाच भाग म्हणून शहरातील रस्त्यांची रोड वॉशर सिस्टीम असलेल्या दोन वाहनांद्वारे साफसफाई करण्यात येत आहे. मुख्य चौकांचे हवा प्रदूषण कमी करण्यासाठी मुव्हेबल फॉग कॅनन डस्ट सप्रेशन प्रणाली पाच नवीन वाहनांवर बसविण्यात आली आहे. त्याद्वारे प्रदूषण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहेत.

– **संजय कुलकर्णी,** सहशहर अभियंता, पर्यावरण विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

### अशी घ्या काळजी....

- » प्रदूषित हवेत जास्त काळ राहणे टाळा
- » बाहेरील शारीरिक श्रम, व्यायाम टाळा
- » बाहेर जाताना शक्यतो मास्क वापरा
- » लहान मुले, वृद्धांची विशेष काळजी घ्या
- » श्‍वसनाचा त्रास झाल्यास तज्ज्ञांचा सल्ला घ्या

### हवेच्या गुणवत्तेत झाली सुधारणा

» फटाके, वाहनांचा धूर, बांधकामांमुळे शहरातील हवेची पातळी धोकायदाक झाली आहे. त्यामुळे शहरातील सर्व बांधकामे १९ नोव्हेंबरपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखरसिंह यांनी दिले होते. हवेच्या गुणवत्तेत मागील "गंभीर" पातळीपेक्षा लक्षणीय घट झाली आहे. हे लक्षात घेऊन आणि ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅनचे पालन करून, बांधकाम व प्रक्रियेवरील बंदी याद्वारे मागे घेण्यात आली असल्याचे आदेश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी निर्गमित केले आहेत.



# मनोज जरांगेंची तोफ पुन्हा धडाडली!

## » छगन भुजबळ यांच्यावर जोरदार हल्ला

।दौंड। महाईन्यूज ।

आरक्षणाचा लढा ७० टक्के जिंकत आला आहे. काही झालं तरी हा लढा जिंकायचा आहे. नोंदी मिळाल्या आहेत. त्या नोंदींचा अहवाल पारित होणार आहे. तो अहवाल स्वीकारत २४ डिसेंबरला सरकार कायदा पारित करून महाराष्ट्रातील मराठा समाजाला ओबीसीचे आरक्षण जाहीर करणार आहे. त्याशिवाय सरकारची सुट्टी नाही, असे जरांगे म्हणाले आहेत. ते पुढे म्हणाले की, २४ डिसेंबरपर्यंत सरकारने आरक्षण दिले नाही तर २५ डिसेंबरला समाजाची बैठक घेऊन पुढील दिशा जाहीर करू. मात्र याबाबत जो काही निर्णय होईल तो शांततेत होईल.

मात्र सरकारला तो निर्णय खूप जड जाईल, असेही जरांगे म्हणाले. मराठा आरक्षणासंदर्भात दौंड तालुक्यातील वरवंड येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जरांगे पाटील बोलत होते. सरकार आणि समाजातीलच काही लोक स्वार्थासाठी समाजाच्या विरोधात भूमिका घेऊ शकतात. कारण सरकारकडे पर्याय राहिला नसल्याचे वक्तव्य मनोज जरांगे पाटील यांनी केले. जरांगे पाटील म्हणाले की, आपल्या समाजातील कार्यकर्त्यांना पुढे घालून मराठा आरक्षणाला विरोध करायला लावायचा. हा एकमेव पर्याय सरकारकडे उरला आहे. त्यांना पत्रकार परिषदा घ्यायला लावायच्या त्यांना आरक्षण नको म्हणायला लावायचं, अशी भूमिका मांडायला लावू शकतात. त्यामुळे त्यांच्या हातापाया पडून सांगा की, तुम्हाला घ्यायचं असेल तर घ्या. हातातोंडाला आलेल्या आरक्षणाच्या घासात विष कालवण्याचे काम करू नका, असा इशारा ही जरांगे यांनी दिला. विजयाचा क्षण जवळ आला आहे. आपल्यात मतभेद होऊ देऊ नका.

कोणता नेता जर मतभेद करत असेल तर त्याच्याकडे बारकाईने लक्ष ठेवा. मराठ्यांच्या विरोधात जाणाऱ्याला कधीच माफ करायचं नाही, असेही जरांगे म्हणाले. आमचं आरक्षण इथं आणि आम्हाला हिंडायला लावलं ५०% च्या वर त्यातच पन्नास पिढ्या गेल्या. घेणं नाही देणं नाही. घे ५० टक्केच्या वर तू घे ना आम्हाला कशाला देतो. तू खातो आतलं. आमचं खातो तुझं खातो. तू ओबीसीचं खातो ओपनमध्ये येतो. ईडब्ल्यूएसमध्ये येतो. खातो तरी किती. तुला साऱ्या दुनियाचं पुरेना. तरीही म्हणतो आमच्यात येऊ नको, असे म्हणत जरांगे पाटील यांनी नाव न घेता मंत्री छगन भुजबळ यांच्यावर जोरदार हल्ला चढविला.

# पुणे महापालिकेतील समाविष्ट गावांतील रहिवाशांना दिलासा!

## » मालमत्ता करात 40 टक्के सवलतीसाठी मुदत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या २३ गावांतील मिळकतींनाही कर आकारणी सुरू झाल्याने या गावातील निवासी मिळकतींना मिळकतकरातील ४० टक्क्यांची सवलत योजना लागू करण्यात आली आहे. त्यासाठी समाविष्ट गावातील मिळकतधारकांना सवलतीसाठी ३१ जानेवारीपर्यंत अर्ज करता येणार आहेत.**




दरम्यान, महापालिकेने यापूर्वीच शहराच्या जुन्या हद्दीसाठी या योजनेला ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. समाविष्ट गावातील मिळकतींच्या नोंदी ठेवण्याची प्रक्रिया महापालिका प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. मांजरी, वाघोली, सूस-म्हाळुंगे, बावधन आदी भागात मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले असून येथील मिळकतींची संख्याही अन्य गावांच्या तुलनेत जास्त आहे. त्यामुळे येथील मिळकतींच्या नोंदी ठेवण्याच्या कामाला विलंब होत असून ग्रामपंचायतीकडे असलेल्या नोंदीनुसार मिळकतींची महापालिकेच्या नियमानुसार कर निश्चिती केली जात आहे. त्यासाठी मिळकत शोधून त्याला नोटीस दिली जात असून सुनावणी घेण्यात येत आहे. समाविष्ट गावातील मिळकतींना टप्प्याटप्प्याने कर आकारणी केली जाणार असून त्यांनाही मिळकतकरातील ४० टक्क्यांची सवलत लागू करण्यात आली आहे. त्यासाठी येथील मिळकतधारकांना पीटी-३ अर्ज भरावा लागणार आहे. मात्र कर निश्चितीची प्रक्रिया सुरू असल्याने या योजनेचा लाभ घेण्यासाठी ३१ जानेवारीपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. समाविष्ट गावात एकूण २ लाख ९३४ मिळकती असून, निवासी मिळकतींची संख्या १ लाख ८२ हजार १६४ एवढी असून, १४ हजार ३५१ व्यावसायिक मिळकती आहेत. मिश्र वापराच्या ३ हजार ७१९ मिळकतींची नोंद महापालिका प्रशासनाकडे आहे. महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या २३ गावांतील मिळकतींनाही कर आकारणी सुरू झाल्याने या गावातील निवासी मिळकतींना मिळकतकरातील ४० टक्क्यांची सवलत योजना लागू करण्यात आली आहे.

### नियमानुसार कर निश्चिती

» समाविष्ट गावातील मिळकतींच्या नोंदी ठेवण्याची प्रक्रिया महापालिका प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. मांजरी, वाघोली, सूस-म्हाळुंगे, बावधन आदी भागात मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले असून येथील मिळकतींची संख्याही अन्य गावांच्या तुलनेत जास्त आहे. त्यामुळे येथील मिळकतींच्या नोंदी ठेवण्याच्या कामाला विलंब होत असून ग्रामपंचायतीकडे असलेल्या नोंदीनुसार मिळकतींची महापालिकेच्या नियमानुसार कर निश्चिती केली जात आहे. त्यासाठी मिळकत शोधून त्याला नोटीस दिली जात असून सुनावणी घेण्यात येत आहे.

---

# प्रदूषण रोखण्यासाठी नियमावलीचे पालन करणे बंधनकारक

## » प्रदूषण रोखा अन्यथा काम बंद; पालिकेने महामेट्रोला दिला इशारा?

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील वाढते प्रदूषण रोखण्यासाठी मेट्रो स्थानकाच्या कामाच्या ठिकाणी तसेच रेडिमिक्स प्लान्टभोवती पत्रे उभारणे आणि हिरवे आच्छादन टाकणे बंधनकारक असतानाही मेट्रो प्रशासनाकडून त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. त्यामुळे प्रदूषण रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करा, अन्यथा काम बंद करावे लागेल, असा इशारा महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी दिला आहे.**



पुणे, मुंबईसह राज्यातील अनेक शहरांमधील प्रदूषणाची पातळी वाढली असून, नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयानेही हवेच्या ढासळत्या गुणवत्तेबाबत चिंता व्यक्त करताना तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश महापालिकांना दिले आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महापालिका प्रशासनाकडूनही उपाययोजना हाती घेण्यात आल्या असून, त्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सूचनेनुसार मेट्रोचे काम करताना होणारे प्रदूषण रोखण्यासाठी नियमावलीचे पालन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र महामेट्रोकडून त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. स्वारगेट येथील जेधे चौकात मेट्रो हब आणि बहुमजली इमारत उभारण्याचे काम सुरू आहे. या चौकात दिवसभर नागरिकांची मोठी गर्दी असते. तसेच वाहनांच्या वर्दळीमुळे प्रदूषण होत असते. मेट्रो हबच्या ठिकाणी बांधकामासाठीचा आरएमसी प्लांटही असून खडी, सिमेंट वाहून आणणाऱ्या वाहनांची संख्याही मोठी आहे. त्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडत आहे. पण या ठिकाणी काम करताना मेट्रोकडून नियमावलीकडे दुर्लक्ष केले जात आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सूचनेनुसार प्रदूषण रोखण्यासाठी पत्रे लावणे आणि हिरव्या रंगाचे अच्छादन टाकणे बंधनकारक आहे. मात्र त्याचे पालन होत नसल्याची तक्रार महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांच्याकडे करण्यात आली होती. त्यामुळे येत्या दोन दिवसांच्या आत प्रदूषण रोखण्यासाठीच्या ठोस उपाययोजना करा अन्यथा काम बंद करावे लागेल, असा इशारा आयुक्तांनी महामेट्रोच्या अधिकाऱ्यांना दिला आहे.

### वाहनांच्या वर्दळीमुळे प्रदूषण

» महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सूचनेनुसार मेट्रोचे काम करताना होणारे प्रदूषण रोखण्यासाठी नियमावलीचे पालन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र महामेट्रोकडून त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. स्वारगेट येथील जेधे चौकात मेट्रो हब आणि बहुमजली इमारत उभारण्याचे काम सुरू आहे. या चौकात दिवसभर नागरिकांची मोठी गर्दी असते. तसेच वाहनांच्या वर्दळीमुळे प्रदूषण होत असते. मेट्रो हबच्या ठिकाणी बांधकामासाठीचा आरएमसी प्लांटही असून खडी, सिमेंट वाहून आणणाऱ्या वाहनांची संख्याही मोठी आहे. त्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडत आहे.

# छठ पुजेनिमित्त रविवारी मोशीत भव्य गंगा आरतीचे आयोजन!

## विश्व श्रीराम सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संयोजक डॉ. लालबाबू गुप्ता यांची माहिती

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भक्त भाविकांची मनोकामना पूर्ण करणाऱ्या छटपुजा उत्सवानिमित्त विश्व श्रीराम सेनेच्या वतीने मोशी येथे इंद्रायणी नदीच्या तीरावर रविवारी (दि.19)सायंकाळी पाच वाजता 'भव्य काशी गंगा आरती'चे आयोजन करण्यात आले आहे.**



राष्ट्रीय एकतेतून राष्ट्र विकास हे ध्येय ठेवून विविध सामाजिक व धार्मिक उपक्रम राबवणाऱ्या विश्व श्रीराम सेना या संस्थेने आयोजित केलेल्या या कार्यक्रमास पालघर हिंदूशक्ती पीठ येथील स्वामी श्री भारतानंद सरस्वती महाराज, विश्व हिंदू परिषदेचे सहमंत्री शंकर गायकर, समस्त हिंदू आघाडीचे संस्थापक मिलिंद एकबोटे,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य राजेश पांडे, आमदार महेश लांडगे, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे महाराष्ट्र राज्य समन्वयक अर्जुन गुप्ता आदी उपस्थित राहणार आहेत अशी माहिती भारतीय खाद्य महामंडळ महाराष्ट्र सल्लागार समिती सदस्य व विश्व श्रीराम सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संयोजक डॉ. लालबाबू अंबीकालाल गुप्ता यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

या महोत्सवाची सांगता सोमवारी पहाटे पाच वाजता सूर्योदय झाल्यानंतर सूर्याला अर्ध्य देऊन होणार आहे. या कार्यक्रमानिमित्त इंद्रायणी घाट परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले आहे. सुर्यषष्टी महाव्रत महापूजा, छोटकी छट, भव्य गंगा आरती सह विविध, धार्मिक, सामाजिक, प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

### धार्मिक उत्सवात नागरिकांनी सहभागी व्हावे



सूर्याची उपासना करण्यासाठी छटपूजेचे व्रत केले जाते. सर्व मनोकामना पूर्ण करणारे हे व्रत असल्याचे प्राचीन काळापासूनची सामाजिक धारणा आहे. निसर्गात आणि समाजात एकरूपता साधणाऱ्या या व्रतात, आस्था, प्रेम, विश्वास, त्याग आणि पर्यावरण (MOSHI ) प्रति समर्पणाची भावना आहे. गतवर्षीप्रमाणे या वर्षी देखील इंद्रायणी घाटावर भव्य गंगा आरती आणि पूजा, भजन, छट लोकगीत सादर करण्यात येणार आहेत. या धार्मिक उत्सवात नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन लालबाबु गुप्ता यांनी केले आहे.

---

# कामकाजाच्या बाबतीत महापालिका अव्वल दर्जा प्राप्त करेल : मोहनमाया भंडारी

## नेपाळमधील बिरेंद्रनगर नगरपालिकेच्या शिष्टमंडळाची पिंपरी महापालिकेस भेट

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा व्यापक विस्तार, केलेली व करण्यात येत असलेली विकासकामे आणि लोकभिमुख दृष्टीकोन पाहून आमचा आत्मविश्वास वाढला असून भविष्यात ही महापालिका कामकाजाच्या बाबतीत अव्वल दर्जा प्राप्त करेल याची खात्री असल्याचे मत नेपाळमधील बिरेंद्रनगर नगरपालिकेच्या नगराध्यक्ष मोहनमाया भंडारी यांनी व्यक्त केले.**



नेपाळ येथील शिष्टमंडळाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीस भेट दिली.आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी त्यांचे स्वागत केले आणि विकास कामांबाबत शिष्टमंडळास माहिती दिली. त्यावेळी आयुक्तांशी चर्चा करताना त्या बोलत होत्या. शिष्टमंडळाचे स्वागत करताना महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप, कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, वास्तू विशारद आणि शहरी प्रकल्प सल्लागार तथा बायसिकेल मेयर आशिक जैन, आय. टी. डी.पी चे उप व्यवस्थापक प्रांजल कुलकर्णी उपस्थित होते.



### पालिकेच्या योजनांविषयी आयुक्तांनी दिली माहिती....

*या शिष्टमंडळात नेपाळचे माजी पर्यटन मंत्री यमलाल कांडेल, बिरेंद्रनगर नगरपालिकेच्या उपनगराध्यक्ष निळकंठ खनाल, प्रशासकीय विभाग प्रमुख प्रकाश टंक, प्रकल्प व्यवस्थापक प्रतिष्ठा कांडेल, प्रकल्प अधिकारी अलिशा कारकी यांचा समावेश होता. आयुक्त शेखर सिंह यांनी शिष्टमंडळास माहिती देताना महापालिका राबवत असलेले प्रकल्प, शहरातील वाहतूक, पार्किंग व्यवस्था , शहरातील पादचारी व सायकल मार्ग याचे नियोजन, पाणीपुरवठा आणि जलनिसारण आदींबाबत नागरिकांचा सहभाग घेऊन करीत असलेल्या उपयायोजनांविषयी सविस्तर माहिती दिली.*

# मध्य प्रदेश बदलाच्या उंबरठ्यावर..




**मध्य प्रदेशात मोठा सामाजिक बदल होणे बराच काळ लांबले गेले. शेजारील उत्तर प्रदेशात १९९० च्या दशकात दलितांचा उठाव झाला. त्या लाटेने बसपाच्या माध्यमातून मध्य प्रदेशच्या उत्तरेकडील पट्ट्यात प्रवेश केला, परंतु लवकरच ती विरून गेली. मध्य प्रदेशच्या पूर्वेकडील झारखंड आणि छत्तीसगड या राज्यांनी आदिवासी राजकारणाचे वर्चस्व पाहिले आहे.**



२१ टक्के आदिवासी लोकसंख्या असलेल्या मध्य प्रदेशातही अशीच अपेक्षा आहे. पण गोंडवाना गणतंत्र परिषदे (जीजीपी) चा उदय रोखण्यात मोठ्या राजकीय शक्तींना यश आले. निम्म्याहून अधिक लोकसंख्या इतर मागासवर्गीयांची असल्याने मध्य प्रदेशाने मंडल राजकारण पाहिलेले नाही. २०१७ मध्ये मंदसौर येथे शेतकरी आंदोलनावर झालेल्या गोळीबारानंतरही शेतकरी संघटनांनी राज्याच्या राजकारणावर फारसा ठसा उमटवलेला नाही. मध्य प्रदेशात सलग मिळालेल्या यशामुळे गेली दोन दशके तिथे भाजपचे राजकीय वर्चस्व होते. तरीही प्रत्येक विधानसभा निवडणुकीदरम्यान पक्षाची लोकप्रियता सातत्याने घसरली आहे. २०१८ मध्ये तेथे काँग्रेसला ११४ जागा मिळाल्या तर भाजपला १०९ जागा. त्यानंतर सत्तेवर आलेले कमलनाथ यांचे सरकार जेमतेम १५ महिन्यांनंतर जोतिरादित्य सिंदिया यांच्या बंडामुळे आणि भाजपच्या ऑपरेशन कमलमुळे पडले. इतकी वर्षे सत्ता राबवूनही आपण राज्यात काय केले ते दाखवण्यासारखे भाजपकडे फारसे काहीही नाही. अनेक सामाजिक-आर्थिक निर्देशकांबाबत मध्य प्रदेशची कामगिरी खराब आहे. या वर्षाच्या सुरुवातीला राज्यात जवळपास ३९ लाख नोंदणीकृत बेरोजगार होते. सरकारी भरतीत विलंब आणि घोटाळ्यांशिवाय दुसरे काहीच नाही. कृषी उत्पादनात सुधारणा होऊनही, शेतकरी आत्महत्यांच्या बाबतीत राज्य देशात चौथ्या क्रमांकावर आहे. राज्यातील दलितांवरील गुन्ह्यांचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीच्या अडीच पट आहे. निती आयोगाच्या आरोग्य निर्देशांकावर मध्य प्रदेश १९ पैकी १७ व्या क्रमांकावर आहे. देशातील सर्वात जास्त बालमृत्यू दर मध्य प्रदेशात आहे. असे असूनही, जनसंघाच्या काळातील संघटनात्मक पाया आणि काँग्रेसचा संघटनात्मक कमकुवतपणा यामुळे सत्ता भाजपकडे आहे. ही निवडणूक वेगळी असेल अशी शक्यता दिसते आहे. सलग १८ वर्षे सत्ता राबवणारे सध्याचे मुख्यमंत्री शिवराज सिंह थकलेले दिसत आहे. दुसरीकडे पारडे काँग्रेसच्या बाजूने झुकल्याचे जाणवत आहे. गेल्या पाच वर्षांत कमलनाथ यांच्या निर्विवाद नेतृत्वामुळे पक्ष पूर्वीपेक्षा अधिक एकसंध झाला आहे. २०१८ ची निवडणूक जिंकूनही फसवणुकीने सत्ता गेल्यामुळे काँग्रेसबद्दल सहानुभूती आहे. राज्यात सामाजिक बदलांचा रेटा निर्माण झाला आहे. एससी/एसटी ॲट्रॉसिटी कायदा सौम्य केल्याच्या विरोधात राज्यात अत्यंत आक्रमक दलित निदर्शने झाली. जय युवा आदिवासी शक्तीच्या बॅनरखाली आदिवासी नेतृत्वाची नवी पिढी उदयास आली आहे. ओबीसी महासभेसारख्या संघटनांच्या नेतृत्वाखाली ओबीसींचा शांततामय उठाव झाला आहे. देशव्यापी शेतकरी आंदोलनाचे पडसादही उमटले आहेत. या सर्व चळवळी प्रस्थापित तसेच संघ-भाजपच्या विरोधात आहेत. या नव्या सामाजिक ऊर्जेचा वापर करून सामाजिक बदलांचे माध्यम बनणे काँग्रेसच्या हातात आहे. पण मतदानपूर्व सर्वेक्षणातून हे काहीही दिसून येत नाही. आम्ही राज्यातील जुलैपासूनच्या एकूण १६ सर्वेक्षणांचा मागोवा घेतला. त्यापैकी आठ सर्वेक्षणांनी काँग्रेसला ११६ म्हणजे बहुमताच्या जवळ किंवा त्यापेक्षा जास्त जागा दिल्या. तर सात जणांनी भाजप काँग्रेसच्या पुढे असल्याचे दाखवले. सीफोर (CFORE ) या एकाच सर्वेक्षणाने काँग्रेसला मध्य प्रदेशात कर्नाटकासारखेच बहुमत मिळण्याची शक्यता वर्तवली आहे. ही सर्वेक्षणे कोणत्या काळात झाली हा मुद्दा बाजूला ठेवून त्यांचा विचार केल्यास भाजपचा सरासरी मतांचा वाटा ४४ टक्क्यांवर येतो, तर काँग्रेसचा ४३ टक्क्यांवर स्थिरावतो. सर्वसाधारणपणे काँग्रेसला मिळणाऱ्या जागा अंदाजे ११६ पेक्षा जास्त तर भाजपच्या १११ आहेत. अर्थात या आकडेवारीचा वापर करून अंतिम निकालाबद्दल अंदाज व्यक्त करणे मूर्खपणाचे ठरेल.

## संपादकीय »

### बायडेन बडबडले..!

***बायडेन-जिनपिंग हे सद्य:स्थितीत पृथ्वीतलावर कुठेही भेटले, या भेटीसमोर इतर सगळे विषयच गौण ठरतात.***

धास्तीकारक विरोधाभास यापेक्षा अधिक निराळा असूच शकत नाही, असे वाटणारी ही भेट. एकाच्या डोळ्यांकडे पाहून त्याच्या मनातले भाव समजत नाहीत. तर दुसरा नेमके काय बोलत आहे याचाच थांग लागत नाही. तशात या दोन व्यक्ती म्हणजे जगातील दोन(च) महासत्ताधीश आहेत आणि ते परस्पर संबंधांच्या भिंगातून जागतिक स्थैर्य आणि शांततेवर ऊहापोह करणार आहेत ही जाणीव तर अधिकच धक्कादायक. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन आणि चीनचे सर्वेसर्वा क्षी जिनपिंग हे आशिया-प्रशांत आर्थिक सहकार्य परिषदेच्या निमित्ताने सान फ्रान्सिस्को येथे आज भेटले. वास्तविक ही भेट हा काही परिषदेच्या कार्यक्रमपत्रिकेवरील मुख्य विषय नव्हे. पण बायडेन-जिनपिंग हे सद्य:स्थितीत पृथ्वीतलावर कुठेही भेटले, तरी या भेटीसमोर इतर सगळे विषयच गौण ठरतात. कारण गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये या दोन देशांतील संबंध कमालीचे ताणले गेले आहेत. व्यापारी आणि आर्थिक विषयांवर तीव्र मतभेद होतेच.

**लोकसभेची निवडणूक जवळ येऊन ठेपल्याने विविध समाज घटकांना खूश करण्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भर दिला आहे. आदिवासींच्या कल्याणासाठी २४ हजार कोटींच्या योजनेचा प्रारंभ त्यांनी केला. याआधी मोदींच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, इतर मागासवर्गीयांपैकी जे पारंपरिक व्यवसाय करतात, त्यांच्यासाठी सुमारे १३ हजार कोटींची विश्वकर्मा योजनेची अंमलबजावणी सुरू झाली होती.**

# निवडणूक प्रचारातच लोककल्याण!



सध्या सुरू असलेल्या विधानसभा निवडणुकांच्या प्रचारातच मोदी यांनी सुमारे ८० कोटी भारतीयांना लाभ होईल अशा पाच किलो मोफत अन्नधान्य देण्याच्या योजनेस पाच वर्षांच्या मुदतवाढीची घोषणा छत्तीसगडमध्ये केली. निवडणूक आचारसंहितेची निष्पक्षपाती अंमलबजावणी करणाऱ्या टी. एन. शेषन यांच्यासारखा अधिकारी मुख्य निवडणूक आयुक्तपदी असता, तर मोदी यांना या घोषणांबद्दल नोटीस धाडली गेली असती. तसे काहीही होण्याची शक्यता नसल्याने प्रचाराच्या पुढल्या टप्प्यांत आणखीही घोषणा खुशाल केल्या जाऊ शकतात. आदिवासींमधील असुरक्षित किंवा अतिमागास गटांच्या कल्याणासाठी २४ हजार कोटींच्या योजनेची घोषणा करण्यासाठी मोदी यांनी निमित्त निवडले बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे. आदिवासींतही आता अतिमागास हा प्रवर्ग या योजनेने निर्माण केला आहे. देशातील सुमारे २२० जिल्ह्यांमधील २८ लाख अतिमागास आदिवासींना या योजनेचा लाभ मिळेल, असे मोदी यांनी झारखंडमधील बिरसा मुंडा यांच्या मूळ गावातून जाहीर केले. रस्ते, दळणवळणाची साधने, वीजपुरवठा, गृहनिर्माण योजना, पाणीपुरवठा, आरोग्य व्यवस्था सुधारणे, शिक्षणाची साधने उपलब्ध करून देणे अशा विविध कामांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. आधीच्या सरकारांनी- म्हणजे काँग्रेसने- आदिवासींकडे दुर्लक्ष केले, त्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने बघितले नाही, अशी नेहमीची टीका मोदींनी केली. पण मोदी सरकार गेली नऊ वर्षे सत्तेत आहे. तेव्हा आदिवासींच्या कल्याणाची आठवण का झाली नाही किंवा हीच वेळ का निवडली? सध्या सुरू असलेल्या चार राज्यांच्या (मिझोराममधील मतदान पूर्ण झाले) विधानसभा निवडणुकांमध्ये आदिवासींची मते लक्षणीय आहेत. मोदींनी भर दिलेल्या आदिवासींमधील असुरक्षित किंवा अतिमागास समाजाचे मतदार चारही राज्यांमध्ये आहेत. मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड आणि तेलंगणामध्ये आदिवासींची मते मिळावीत हा प्रयत्न असेलच, शिवाय आगामी लोकसभेची निवडणूक लक्षात घेता आदिवासींच्या अधिक जवळ जाण्याचा भाजपचा प्रयत्न दिसतो. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या आदिवासी असल्याचा उल्लेख पदोपदी करून, आदिवासींची मते जिंकण्याचा प्रयत्न भाजपकडून सुरू असतोच. त्याचाच पुढील भाग म्हणजे २४ हजार कोटींची ही योजना. लोकसभेच्या ४७ जागा या आदिवासी समाज किंवा अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत. यापैकी ३१ जागा गेल्या वेळी भाजपने जिंकल्या होत्या.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# जरांगेंच्या बाजूने आंबेडकर मैदानात!

## » ओबीसी नेत्यांचा उल्लेख करत जरांगे पाटलांचा आरोप

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात मराठा आरक्षणाचा विषय तापला आहे. मराठा समाजाला आरक्षण द्यावं यासाठी मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दोन महिन्यांची मुदत दिली आहे. दुसऱ्या बाजूला राज्य सरकारने राज्यातल्या ज्या-ज्या मराठा कुटुंबांकडे मागील दोन-तीन पिढ्यांमधल्या कुणबी नोंदी आहेत त्या कुटुंबांना कुणबी जातप्रमाणपत्र देण्यास सुरुवात केली आहे.**



या मराठा कुटुंबांचा कुणबी जातप्रमाणपत्रासह ओबीसी आरक्षणात समावेश होणार आहे. त्यामुळे राज्यातल्या ओबीसी नेत्यांनी त्यास विरोध केला आहे. राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यात आघाडीवर आहेत. गेल्या काही दिवसांपासून राज्यात छगन भुजबळ विरुद्ध मनोज जरांगे पाटील असा संघर्ष चालू आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांचे राज्यभर दौरे चालू आहेत. ते राज्यभरात मोर्चे काढत आहेत, साखळी आंदोलनं करत आहेत. जरांगे यांच्या सभांना लाखो लोकांची गर्दी जमत आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांना आव्हान देण्यासाठी छगन भुजबळ यांच्यासह राज्यातल्या ओबीसी नेत्यांनी जालन्यातल्या आंबड येथे ओबीसी एल्गार मोर्चा काढला. मोर्चानंतर ओबीसी एल्गार सभेला संबोधित केलं. यावेळी छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर सडकून टीका केली. एकीकडे राज्यातले ओबीसी नेते मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीला विरोध करत आहेत. तर दुसऱ्या बाजूला, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणाच्या मागणीचं समर्थन केलं आहे. तसेच आंबेडकर म्हणाले, संविधानाच्या चौकटीत राहून मराठ्यांना आरक्षण देता येईल. ओबीसींची मागणी आहे की त्यांना वेगळं ताट हवं, तर मराठा समाजाची मागणी आहे की त्यांनाही वेगळं ताट हवं. मला असं वाटतं की, त्यांची ही मागणी संविधानाच्या चौकटीत राहून आपण पूर्ण करू शकतो. असं असतांना दोन समाजांना भिडवण्याचं कारण काय? प्रकाश आंबेडकर म्हणाले, जरांगे पाटील यांनी जालन्यातल्या गावातून आंदोलन सुरू केलं. त्याच जालन्यातल्या आंबड तालुक्यात छगन भुजबळ गेले. जरांगेंना आव्हान देण्यासाठी भुजबळ तिथे गेले. माझं म्हणणं आहे की, राजकारणात एकमेकांना आव्हान कशाला देताय? या मातीत आपण जगलो आणि याच मातीत एकत्र राहणार आहोत. प्रत्येक प्रश्न घटनेच्या चौकटीत राहून सोडवता येतो. आमच्या कायदेशीर सल्लागार पथकाने म्हटलं आहे की, घटनेच्या चौकटीत राहून कोणाचंही आरक्षण काढून न घेता मराठा समाजाला आरक्षण देता येईल.

### भुजबळांची जरांगे पाटीलावर टीका

» मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांचे राज्यभर दौरे चालू आहेत. ते राज्यभरात मोर्चे काढत आहेत, साखळी आंदोलनं करत आहेत. जरांगे यांच्या सभांना लाखो लोकांची गर्दी जमत आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांना आव्हान देण्यासाठी छगन भुजबळ यांच्यासह राज्यातल्या ओबीसी नेत्यांनी जालन्यातल्या आंबड येथे ओबीसी एल्गार मोर्चा काढला. मोर्चानंतर ओबीसी एल्गार सभेला संबोधित केलं. यावेळी छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर सडकून टीका केली.

# राज्यातील समाज एकमेकांसमोर उभे राहतात

## »मराठा अन् ओबीसी आरक्षणावर देवेंद्र फडणवीसांची प्रतिक्रिया

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जालन्यातील अंबड येथे 'ओबीसी आरक्षण बचाव एल्गार सभा' आयोजित करण्यात आली होती. या सभेला मंत्री छगन भुजबळ, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार आणि अन्य ओबीसी नेत्यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांना लक्ष्य केलं. यामुळे आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. तसेच, मराठा आणि ओबीसी समाजात आरक्षणावरून तणाव वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.**

यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केलं आहे. "ओबीसी समाजावर अन्याय होईल, असे निर्णय सरकार घेणार नाही. तसेच, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे," अशी ग्वाही देवेंद्र फडणवीसांनी दिली. ते नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. मराठा आणि ओबीसी समाजात तणाव वाढताना दिसत आहे, याबद्दल प्रतिनिधीनं प्रश्न विचारल्यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, "राज्यात कुठलेही समाज एकमेकांसमोर उभे राहतात, अशी परिस्थिती निर्माण होणं योग्य नाही. सरकार ओबीसी समाजावर अन्याय होऊ देणार नाही. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी कटिबद्ध आहोत. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट घोषणा केली आहे."

"ओबीसी समाजावर अन्याय होईल, असे निर्णय राज्य सरकार घेणार नाही. महाराष्ट्रात शांतता नांदण्यासाठी प्रयत्न करूयात," असं देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं. 'रूग्णालय आपल्या दारी' या योजनेबद्दलही देवेंद्र फडणवीसांनी माहिती दिली आहे. "नागपुरात खणिकर्मचा निधी उपलब्ध आहे, त्यातून 'रूग्णालय आपल्या दारी' ही योजना सुरू करण्याचा प्रयत्न करत आहे.



### शांतता नांदण्यासाठी प्रयत्न

» जालन्यातील अंबड येथे 'ओबीसी आरक्षण बचाव एल्गार सभा' आयोजित करण्यात आली होती. या सभेला मंत्री छगन भुजबळ, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार आणि अन्य ओबीसी नेत्यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांना लक्ष्य केलं. यामुळे आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. तसेच, मराठा आणि ओबीसी समाजात आरक्षणावरून तणाव वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे." "ओबीसी समाजावर अन्याय होईल, असे निर्णय राज्य सरकार घेणार नाही. महाराष्ट्रात शांतता नांदण्यासाठी प्रयत्न करूयात," असं देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं. 'रूग्णालय आपल्या दारी' या योजनेबद्दलही देवेंद्र फडणवीसांनी माहिती दिली आहे. "नागपुरात खणिकर्मचा निधी उपलब्ध आहे, त्यातून 'रूग्णालय आपल्या दारी' ही योजना सुरू करण्याचा प्रयत्न करत आहे.

# सायरस पूनावाला यांना हृदयविकाराचा सौम्य झटका, रुबी हॉल क्लिनिकमध्ये उपचार सुरु

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

जगातील नामांकित सीरम इन्स्टिट्यूटसह सायरस पूनावाला ग्रुपचे चेअरमन आणि व्यवस्थापकिय संचालक सायरस पूनावाला काल (१६ नोव्हेंबर) ला हृदयविकाराचा सौम्य झटका आल्याची माहिती समोर आली आहे. सध्या त्यांच्यावर पुण्यातील रुबी हॉल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असून त्यांची प्रकृती आता स्थिर असल्याची माहिती रुबी हॉस्पिटलच्या प्रशासनाकडून मिळाली आहे. सायरस पूनावाला यांचं सध्याचं वय ८२ असून त्यांना काल हृदयविकाराचा सौम्य धक्का बसला होता.

रुबी हॉल हॉस्पिटल प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार १६ तारखेला त्यांना सौम्य असा हृदयविकाराचा झटका आला होता. रुबी हॉल क्लिनिकचे डॉ. परवेझ ग्रांट यांनी सायरस पूनावाला



यांना हृदयविकाराचा सौम्य धक्का बसला होता आता त्यांची प्रकृती झपाट्यानं सुधारत असल्याचं म्हटलं. रुग्णालयाचे सल्लागार अली दारुवाला यांनी जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार डॉ. सायरस पुनावाला यांना १६ नोव्हेंबरला हृदयविकाराचा सौम्य धक्का बसला होता. त्यांना आज सकाळी रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आलं. डॉ. परवेझ ग्रांट, डॉ. माकले आणि डॉ. अभिजीत खर्डेकर यांच्या निगराणीखाली सायरस पूनावाला यांच्यावर अँजिओप्लास्टी करण्यात आली, आता त्यांची प्रकृती वेगानं सुधारत असल्याची माहिती देखील अली दारुवाला यांनी दिली.


# उच्चशिक्षित तरुणींना मोफत स्कूटी!

## काँग्रेसच्या जाहीरनाम्यात घोषणांचा पाऊस

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**तेलंगणात येत्या ३० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणूक होणार आहे. राज्यातले स्थानिक पक्ष तसेच काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टीनेही तेंलगणात प्रचाराला सुरुवात केली आहे. दरम्यान, काँग्रेसने तेलंगणा विधानसभा निवडणुकीसाठी त्यांचा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. या जाहिरनाम्यात काँग्रेसने तेलंगणातील जनतेला अशी काही आश्वासनं दिली आहेत, ज्याची देशभर चर्चा सुरू झाली आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या उपस्थितीत तेलंगणा काँग्रेसमधील वरिष्ठ नेत्यांनी शुक्रवारी (१७ नोव्हेंबर) पक्षाचा विधानसभा निवडणुकीचा जाहीरनामा सादर केला.**



काँग्रेसने त्यांच्या जाहीरनाम्यात अवघ्या ५०० रुपयांमध्ये एलपीजी सिलेंडर (स्वयंपाकाचा गॅस) आणि मोफत वीज देऊ अशी घोषणा केली आहे. तसेच मुलींच्या लग्नात सोनं आणि रोख पैसे देण्याचं आश्वासनही दिलं आहे. दरम्यान, यावेळी केलेल्या भाषणात मल्लिकार्जुन खरगे यांनी तेलंगणाला वेगळं राज्य बनवण्यासाठी काँग्रेसने आणि पक्षाच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांनी घेतलेल्या भूमिकांचा पुनरुच्चार केला. मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, आम्ही कर्नाटकातल्या जनतेला पाच मोठी आश्वासनं दिली आहेत.

### तेंलगणात जाहीरनामा प्रसिद्ध

» त्यांना २० लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज दिलं जाईल.तेलंगणात येत्या ३० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणूक होणार आहे. राज्यातले स्थानिक पक्ष तसेच काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टीनेही तेंलगणात प्रचाराला सुरुवात केली आहे. दरम्यान, काँग्रेसने तेलंगणा विधानसभा निवडणुकीसाठी त्यांचा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. या जाहिरनाम्यात काँग्रेसने तेलंगणातील जनतेला अशी काही आश्वासनं दिली आहेत, ज्याची देशभर चर्चा सुरू झाली आहे.

तर दुसऱ्या बाजूला ज्या लोकांनी रामाच्या नावाने मतं मागितली, त्यांनी राज्यासाठी काहीच केलेलं नाही. काँग्रेस महिलांना मोफत बस प्रवासाची सुविधा देत आहे. त्यामुळे महिला दररोज बसने प्रवास करू लागल्या आहेत. बसने मंदिरात जाऊ लागल्या आहेत. ५०० रुपयांमध्ये स्वयंपाकाचा गॅस सिलेंडर दिला जाईल. महिला बसने मोफत प्रवास करू शकतील.२०० युनिटपर्यंतची वीज मोफत. इंदिरम्मा उपहार योजनेअंतर्गत हिंदूंना त्यांच्या मुलीच्या लग्नात १ लाख रुपये इतकी रक्कम आणि १० ग्रॅम (एक तोळा) सोनं दिलं जाणार. तर अल्पसंख्यांकांना त्यांच्या मुलींच्या लग्नाच्या वेळी १,६०,००० रुपये दिले जातील. प्रत्येक उच्च शिक्षित तरुणीला मोफत स्कूटी दिली जाईल. शेतकऱ्यांचं एक लाख रुपयांपर्यंतचं पीक कर्ज माफ केलं जाईल.

# इस्रायल दक्षिण गाझामध्ये लष्करी कारवाईचा विस्तार

## एकता आणि सहकार्य असण्याची आवश्यकता : मोदी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या ४१ दिवसांपासून इस्रायल आणि हमासमध्ये युद्ध चालू आहे. या युद्धावर जागतिक नेते लक्ष ठेवून आहेत. हे नेते सातत्याने युद्धावर आणि युद्धाच्या परिणामांवर बोलत आहेत. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेदेखील या युद्धावर लक्ष आहे. दुसऱ्या व्हॉईस ऑफ ग्लोबल साऊथ समिटच्या उद्घटनाच्या सत्रातही नरेंद्र मोदी यांनी या युद्धावर भाष्य केलं. यावेळी नरेंद्र मोदी यांनी हिंसा आणि दहशतवादाविरोधात भारताच्या कठोर भूमिका मांडल्या.**

तसेच इस्रायल-हमास युद्धामुळे पश्चिम आशियात वाढलेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी सर्व देशांमध्ये एकता आणि सहकार्य असण्याची आवश्यकता असल्याचं मोदी यांनी यावेळी अधोरेखित केलं. तसेच ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने इस्रायलवर केलेल्या हल्ल्याचा निषेध नोंदवला. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, आपण सगळेजण पाहत आहोत की, पश्चिम आशियातल्या घटनांमुळे नवी आव्हानं निर्माण झाली आहेत. ७ ऑक्टोबर रोजी इस्रायलवर झालेल्या हल्ल्याचा भारताने निषेध नोंदवला आहे. तसेच भारताने संयम बाळगला आहे. आम्ही सध्या संवाद आणि मुत्सद्देगिरीवर भर दिला आहे. या युद्धात सामान्य जनता भरडली जात आहे. आम्ही या गोष्टीचा निषेध करतो. पॅलेस्टाईनचे राष्ट्रपती महमूद अब्बास यांच्याशी बातचीत केल्यानंतर आम्ही पॅलेस्टाईनमधील नागरिकांसाठी मानवतावादी मदत पाठवली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, "ग्लोबल साऊथमधल्या देशांनी आता मोठ्या जागतिक




हितांसाठी एकत्र यायला हवं. जगाच्या भल्यासाठी आपण एकत्र येण्याची हीच योग्य वेळ आहे." ग्लोबल साऊथ देशांचा एक समूह आहे. आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका खंडातील देशांचा यात समावेश आहे. दुसऱ्या बाजूला गेल्या ४२ दिवसांपासून इस्रायल आणि हमासमध्ये युद्ध चालू आहे. हमासचा समूळ नायनाट करण्यासाठी इस्रायलने आता गाझा पट्टीत जमिनी कारवाई सुरू केली आहे. इस्रायली सैन्याने दक्षिण गाझामध्ये पत्रके टाकून पॅलेस्टिनी नागरिकांना तो भाग सोडून जाण्यास सांगितलं आहे. त्यामुळे इस्रायल आता दक्षिण गाझामध्ये लष्करी कारवाईचा विस्तार करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. इस्रायलच्या फौजांनी

### नागरिकांसाठी मानवतावादी मदत

» या युद्धात सामान्य जनता भरडली जात आहे. आम्ही या गोष्टीचा निषेध करतो. पॅलेस्टाईनचे राष्ट्रपती महमूद अब्बास यांच्याशी बातचीत केल्यानंतर आम्ही पॅलेस्टाईनमधील नागरिकांसाठी मानवतावादी मदत पाठवली आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, "ग्लोबल साऊथमधल्या देशांनी आता मोठ्या जागतिक हितांसाठी एकत्र यायला हवं. जगाच्या भल्यासाठी आपण एकत्र येण्याची हीच योग्य वेळ आहे." ग्लोबल साऊथ देशांचा एक समूह आहे. आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका खंडातील देशांचा यात समावेश आहे.

उत्तर गाझामधील अल-शिफा या सर्वात मोठ्या रुग्णालयात शोध मोहीम गुरुवारीदेखील सुरू ठेवली. या रुग्णालयात काही बंदुका सापडल्याचा दावा इस्रायलकडून करण्यात आला आहे. मात्र, रुग्णालयाच्या खाली हमासचा तळ असल्याचा त्यांचा दावा सिद्ध करणारे कोणतेही पुरावे त्यांनी अद्याप दिलेले नाहीत. रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनीदेखील इस्रायलचे हे आरोप फेटाळले आहेत. तसेच ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने इस्रायलवर केलेल्या हल्ल्याचा निषेध नोंदवला. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, आपण सगळेजण पाहत आहोत की, पश्चिम आशियातल्या घटनांमुळे नवी आव्हानं निर्माण झाली आहेत. ७ ऑक्टोबर रोजी इस्रायलवर झालेल्या हल्ल्याचा भारताने निषेध नोंदवला आहे. तसेच भारताने संयम बाळगला आहे. आम्ही सध्या संवाद आणि मुत्सद्देगिरीवर भर दिला आहे.



# इम्रानला त्या वक्तव्यावर माफी मागावी लागली!

बॉलीवूडमध्ये आपल्या अभिनयानं आणि हटक्या स्टाईलनं वेगळी ओळख तयार करणाऱ्या अभिनेत्यांमध्ये इम्रान हाश्मीचे नाव घ्यावे लागेल. बॉलीवूडमधील सीरियल किसर म्हणूनही त्याचे नाव चर्चेत राहिलं आहे. तो आता बॉलीवूडचा भाईजान सलमान खानच्या टायगर ३ मध्ये व्हिलनच्या भूमिकेत आहे. सलमानचा टायगर ३ हा नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतो आहे. त्याला बॉक्स ऑफिसवर प्रेक्षकांचा मोठा प्रतिसादही मिळाला आहे. अशावेळी इम्रान हाश्मीच्या भूमिकेनं नेटकऱ्यांची पसंती मिळवली आहे. त्याचे कौतुक होत आहे. आता तर त्याच्या एका जुन्या मुलाखतीनं पुन्हा एकदा तो ट्रेंडिंगचा विषय आहे. सध्या इम्रान हा त्याच्या टायगर ३ मुळे जोरदार चर्चेत आला आहे. त्यानं या चित्रपटातून पहिल्यांदाच सलमान खानसोबत स्क्रिन शेयर केली आहे. ज्यामुळे तो लाईमलाईट आला आहे. कधीकाळी प्रसिद्धीच्या कमालीच्या झोतात आलेल्या इम्रान हाश्मीच्या लोकप्रियतेचा टेंपो हा अचानक खाली आला होता. तो त्याच्या वैयक्तिक आयुष्यातील वादळामुळे देखील चर्चेत आला होता. टायगर ३ च्या निमित्तानं इम्रान हा वेगवेगळ्या ठिकाणी मुलाखती देतो आहे. त्यातून तो त्याच्या बॉलीवूड्च्या प्रवासाला उजाळा देतो आहे. यावेळी त्यानं एका मुलाखतीतून प्रसिद्ध अभिनेत्री ऐश्वर्या रॉयवर जे वक्तव्य केले होते याबद्दल सांगितले. मी फारसा मुलाखतींना जात नाही. कारण मी त्या मुलाखतींमध्ये कंफर्ट नसतो. अनेकदा मी रागाच्या भरात काहीही बोलून जातो. असेही त्याचे म्हणणे होते. मी जर आता परत कॉफी विथ करणमध्ये गेलो तर सगळं बिघडून टाकेल. खरं सांगतो माझ्या मनात कुणाविषयी काहीही नाही. मला कुणाविषयी वाईट बोलायचं नाही. मी तेव्हा ज्यांच्याविषयी बोललं होतं तेव्हा मला ते गिफ्ट हॅम्पर जिंकायचे होते. मला असं विचारण्यात आलं होतं की, प्लॅस्टिक म्हटल्यावर तुझ्या डोळ्यासमोर कुणाचं नाव येतं, तेव्हा इम्राननं ऐश्वर्याचे नाव घेतले होते.

# 'मृदगंध जीवनगौरव' पुरस्कार जाहीर!

चित्रपटाचा विषय कोणताही असो आपल्या अष्टपैलु अभिनयानं प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या अभिनेत्यांमध्ये ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर यांच्या नावाचा आवर्जुन उल्लेख करावा लागेल. गेल्या चार दशकांहून अधिक काळ त्यांनी चित्रपट,नाटक, मालिका सारख्या वेगवेगळ्या माध्यमांतून आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे. केवळ मराठीच नाहीतर हिंदी भाषेत देखील त्यांच्या अभिनयाचे असंख्य चाहते आहेत. मुन्नाभाई एमबीबीएसमध्ये त्यांनी साकारलेली महात्मा गांधीजींची भूमिका ही प्रेक्षकांच्या मनात घर करुन आहे. अशातच आता प्रभावळकर यांच्या आजवरच्या कामाची पोचपावती म्हणून त्यांना दिल्या जाणाऱ्या पुरस्काराची बातमी चर्चेत आहे. त्यांना मृदगंध जीवनगौरव पुरस्कारानं गौरविलं जाणार आहे. विठ्ठल उमप फाऊंडेशन तर्फे 'मृदगंध पुरस्कार'प्रदान केला जाणार असल्याची माहिती फाऊंडेशनचे अध्यक्ष नंदेश विठ्ठल उमप यांनी दिली आहे. यंदाचा १३ वा लोकशाहीर विठ्ठल उमप स्मृती संगीत समारोह व विठ्ठल उमप फाऊंडेशनचा 'मृदगंध पुरस्कार' वितरणाचा भव्य सोहळा येत्या २६ नोव्हेंबरला काशिनाथ घाणेकर सभागृह, ठाणे येथे सायंकाळी ६.०० वा पार पडणार आहे.

# रश्मिका नंतर काजोलचा 'डीपफेक'



हा सिंथेटिक मीडियाचा प्रकार आहे. एखादा फोटो किंवा व्हिडिओतील व्यक्तीचा चेहरा दुसऱ्या व्यक्तीच्या चेहऱ्याने रिप्लेस करता येतो. अशा पद्धतीने बनावट फोटो किंवा व्हिडिओ बनवणे यात फारसे काही नवीन नाही. पण DEEP FAKE मध्ये आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा वापर करून अतिशय तंतोतंत बनावट व्हिडिओ किंवा फोटो बनवला जातो. चेहऱ्यावरील अनैसर्गिक भाग, डोळे आणि डोके यांच्यात समन्वय नसणे यातून DEEP FAKE व्हिडिओ ओळखता येतो. रश्मिकाने आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की,"हे शेअर करत असताना मला खरोखर वाईट वाटत आहे. माझ्याबद्दलचा डीप फेक व्हिडिओ ऑनलाइन पसरवला जात आहे. त्याबद्दल मला प्रामाणिकपणे बोलायचे आहे.केवळ माझ्यासाठीच नाही, तर तंत्रज्ञानाचा कसा दुरुपयोग केला जात असल्यामुळे आज खूप हानी होण्यास असुरक्षित असलेल्या आपल्यापैकी प्रत्येकासाठी हे अत्यंत भीतीदायक आहे. आज एक महिला आणि एक अभिनेत्री म्हणून, मी माझे कुटुंब, मित्र आणि हितचिंतक यांच्याबद्दल आभारी आहे. जे माझे संरक्षण आणि समर्थन करत आहेत; पण मी शाळा किंवा कॉलेजमध्ये असताना माझ्यासोबत असे काही घडले असेल, तर मी याला कसे सामोरे जाऊ शकले असते, याची मी खरोखर कल्पना करू शकत नाही.आपल्यापैकी अधिक लोकांना अशा ओळख चोरीचा परिणाम होण्याआधी एक समुदाय म्हणून आणि तातडीने याकडे लक्ष देण्याची गरज आहे. आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा कशा प्रकारे गैरवापर होऊ शकतो, याचे उदाहरण म्हणजे DEEP FAKE टेक्नॉलॉजी. एखाद्या व्हिडिओत दुसऱ्या व्यक्तीचा चेहरा आणि आवाज हुबेहुबरीत्या बदलण्याचा चमत्कार हे तंत्रज्ञान करू शकते. हा बदल इतका अचूक असतो की, सर्वसामान्यांना खरा व्हिडिओ आणि खोटा व्हिडिओ यातील फरक ओळखणेही कठीण जाते. या तंत्रज्ञानाची रश्मिका मंदाना बळी ठरली आहे. रश्मिकाचा चेहरा वापरून एक व्हिडिओ मॉर्फ करण्यात आला आहे.V्हा व्हिडिओ खरा की खोटा हे ओळखता न आल्याने रश्मिकाचाच व्हिडिओ असे समजून हा व्हिडिओ एक्सवर लाखो लोकांनी पाहिला आहे. हा धक्कादायक प्रकार पुढे आल्यानंतर अमिताभ बच्चन यांनीही अशा प्रकारांवर कायदेशीर कारवाई व्हावी अशी मागणी केली आहे.हा मूळ व्हिडिओ झारा पटेल या महिलेचा आहे. झारा पटेल लिफ्टमधून बाहेर येतानाचा हा व्हिडिओ आहे.

# महाभारत तीन भागात करणार चित्रपट निर्मिती!

द काश्मीर फाईल्स, द व्हॅक्सिन वॉर सारख्या प्रसिद्ध चित्रपटांचे दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री यांनी आता त्यांच्या नव्या चित्रपटाची घोषणा केल्याच्या बातम्यांना उधाण आले आहे. अग्निहोत्री यांच्या इंस्टावरील त्या पोस्टनं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. येत्या काळात महाभारतावर आधारित तीन भागांत चित्रपट बनविण्याचा निर्धार अग्निहोत्री यांनी व्यक्त केला आहे. प्रसिद्ध अभिनेता प्रभास आणि क्रिती सेननच्या आदिपुरुषला नेटकऱ्यांकडून नकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर अनेक मेकर्सनं आगामी काळात ऐतिहासिक काळातील चित्रपट बनविण्याविषयी सावध भूमिका घेतली आहे. अशात अग्निहोत्री यांनी संस्कृत महाकाव्यावर चित्रपट तयार करणार असल्याच्या चर्चेला उधाण आले होते. अग्निहोत्री यांचे म्हणणे आहे की, आपण या महाकाव्यावर चित्रपट केला तर त्याला प्रामाणिकपणे न्याय देणार. अग्निहोत्री यांनी याबाबत टाईम्स नाऊसोबत बातचीत केली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, माझ्याकडे जेव्हा महाभारतावर आधारित चित्रपट बनविण्याचा प्रस्ताव आला तेव्हा मी खूपच विचारात पडलो. मी माझ्या आयुष्याचा बराचसा काळ हा वाचनात, अभ्यासात आणि संशोधनात घालवला आहे. मात्र महाभारताच्या कथेबाबत माझा दृष्टिकोन वेगळा आहे. असे त्यांचे म्हणणे आहे. अग्निहोत्री यांनी म्हटले होते की, मला जर या अशा प्रकारच्या इतिहासाला समोर आणायचं असेल तर मी ते करणार. बाकीची लोकं बॉक्स ऑफिसवर दुसरं काही तयार करत आहेत. अशावेळी मी काही वेगळं करण्याचा प्रयत्न करतो आहे. अनेकांनी यापूर्वी अर्जुन, भीम यांचा महिमा कथन केला आहे.

# वाराणसीच्या घाटावर सनी लियोनीनं केली गंगेची आरती!

बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री सनी लियोनी ही नेहमीच तिच्या वेगवेगळ्या कारणांसाठी चर्चेत असणारी सेलिब्रेटी आहे. सोशल मीडियावर सनी तिच्या हटके स्टाईलसाठी ओळखली जाते. आता तिचे गंगा आरती करतानाचे फोटो व्हायरल झाले असून नेटकऱ्यांनी तिच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. यापूर्वी देखील सनी तिच्या बिनधास्त अंदाजामुळे लाईमलाईटमध्ये आली होती. एरवी ती तिच्या परखड प्रतिक्रिया देण्याच्या स्वभावासाठी परिचित आहे. ट्रोल करणाऱ्यांना देखील जशास तसे उत्तर देणाऱ्या सनीचे आगामी काळात मोठे प्रोजेक्ट प्रेक्षकांसमोर येणार आहे. बॉलीवूडचे प्रसिद्ध दिग्दर्शक, निर्माते अनुराग कश्यपच्या एका चित्रपटामध्ये सनी चमकणार आहे. त्याची बऱ्याच दिवसांपासून चर्चा आहे. बॉलीवूड सेलिब्रेटी अभिनेत्रींना सपोर्ट करण्यात देखील सनीनं अनेकदा पुढाकार घेतला आहे. याशिवाय विविध सामाजिक कामांमध्ये तिचा सक्रिय सहभाग दिसून येतो. कोरोनाच्या काळात देखील सनीनं सामाजिक कामांमध्ये घेतलेल्या पुढाकाराचे चाहत्यांनी, नेटकऱ्यांनी कौतुक केले होते. देश,जागतिक पातळीवर अनेक एनजीओशी सनी जोडली गेली आहे. सध्या सनी लिओनी गायक अभिषेक सिंगसह तिच्या अलीकडील डान्स व्हिडिओच्या प्रमोशनसाठी अनेक ठिकाणी फिरत आहे. यावेळी सनीनं वाराणसी भेट दिली आहे. वाराणसी सारख्या धार्मिक शहराला तिने भेट दिली आणि सोशल मीडिया वर खास पोस्ट शेयर केली आहे. केनेडी अभिनेत्रीने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले आहे. या दौऱ्या दरम्यान सनीनं तिच्या पेहरावातून नेटकऱ्यांचे, चाहत्यांचे लक्ष वेधून घेतल्याचे दिसून आले आहे. गुलाबी सलवार सूटमध्ये ती अगदीच पारंपारिक भारतीय पोशाखात कौतुकाचा विषय होती. त्यानंतर तिनं गंगा आरती वेळी परिधान केलेला पोशाख चाहत्यांच्या प्रतिक्रियेचा विषय आहे.

# द. आफ्रिका पुन्हा ‘चोकर्स’!

## ऑस्ट्रेलियाची आठव्यांदा फायनलमध्ये धडक

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**वनडे वर्ल्डकपच्या राऊंड रॉबीन लीगमध्ये भारतानंतर दुसऱ्या क्रमांकाचा यशस्वी संघ म्हणून गणला गेलेल्या दक्षिण आफ्रिकन संघाने ऐन मोक्याच्या क्षणी कच खाल्ली. कोलकाता येथे सेमीफायनल लढतीत ऑस्ट्रेलियाने त्यांच्यावर 3 विकेट्सने निसटता विजय मिळवून आठव्यांदा फायनलमध्ये प्रवेश केला. एकदिवसीय विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत आफ्रिकेचा संघ पराभूत होण्याची ही पाचवी वेळ आहे. त्यामुळे हा संघ पुन्हा एकदा चोकर्स ठरला आहे. आता रविवारी (19 नोव्हेंबर) अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर तीनवेळचा विश्वविजेता भारत आणि पाचवेळचा ऑस्ट्रेलिया या दोन संघात अंतिम सामना रंगणार आहे.**

दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. 49.4 षटकात 212 धावा त्यांचा संघ ऑलआऊट झाला. डेव्हिड मिलरने सर्वाधिक 101 धावा केल्या. मिचेल स्टार्क आणि पॅट कमिन्सने 3-3 विकेट घेतल्या. प्रत्युत्तरात 213 धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाची सुरुवात चांगली झाली. डेव्हिड वॉर्नर आणि ट्रॅव्हिस हेड यांनी पहिल्या विकेटसाठी सहा षटकांत 60 धावा जोडल्या. यानंतर 29 धावांवर वॉर्नर मार्करामचा बळी ठरला. रबाडाने मार्शला खातेही उघडू दिले नाही, पण हेडसह स्मिथने डावाची धुरा सांभाळली. दोघांनी 45 धावा जोडल्या. हेडला बाद करून केशव महाराजने आफ्रिकेला सामन्यात परत आणले. हेडने 48 चेंडूत 62 धावा केल्या. यानंतर आफ्रिकन फिरकी गोलंदाजांनी आपली पकड घट्ट केली. ज्यामुळे कांगारू फलंदाजांना धावा काढणे कठीण झाले. शम्सीने 18



धावांच्या स्कोअरवर लॅबुशेनला पायचीत केले आणि नंतर एका धावेवर मॅक्सवेलला बोल्ड केले. इंग्लिस आणि स्मिथने 37 धावांची भागीदारी करून ऑस्ट्रेलियाला लक्ष्याच्या जवळ नेले. 30 धावांच्या स्कोअरवर कोएत्झीने स्मिथला बाद केले. तर इंग्लिशला 28 धावांवर तंबूत पाठवले. मात्र, मिचेल स्टार्क आणि पॅट कमिन्स यांनी आठव्या विकेटसाठी 22 धावांची नाबाद भागीदारी करून संघाला विजय मिळवून दिला. स्टार्क 16 तर कमिन्स 14 धावांवर नाबाद राहिला. आफ्रिकेकडून गेराल्ड कोएत्झी आणि तबरेझ शम्सी यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. कागिसो रबाडा, एडन मार्कराम आणि केशव महाराज यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. तत्पूर्वी, दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बवुमाने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. हा निर्णय त्यांच्या अंगलट आला. कांगारूंच्या मा-यापुढे प्रोटीस संघाने लोटांगण घातले, ज्यामुळे त्यांचा डाव 212 धावांत संपुष्टात आला. डेव्हिड मिलर खेळला नसता तर आफ्रिकेला तेवढ्याही धावा करता आल्या नसत्या. या दोघांसमोर प्रमुख गोलंदाज अपयशी ठरत असताना पार्ट टाईम गोलंदाज ट्रॅव्हिस हेडने कमाल केली. मिलर व कोएत्झी यांची 53 धावांची भागीदारी पॅट कमिन्सने तोडली. कोएत्झी 19 धावांवर झेलबाद झाला; परंतु त्याने डीआरएस घेतला असता तर तो नाबाद राहिला असता. 2015 च्या बाद फेरीतील सामन्यात फॉफ ड्यू प्लेसिसने न्यूझीलंडविरुद्ध 82 धावांची खेळी केली होती आणि ती वर्ल्ड कपच्या बाद फेरीतील आफ्रिकेकडून झालेली सर्वोत्तम वैयक्तिक खेळी होती. आज मिलरने हा विक्रम स्वतःच्या नावावर केला. ऑसींचा प्रमुख गोलंदाज स्टार्क आला अन् त्याने केशव महाराजला माघारी पाठवला. मिलरने षटकाराने शतक पूर्ण केले.

### डेव्हिड मिलर खेळला नसता तर...

टेम्बा बवुमाने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. हा निर्णय त्यांच्या अंगलट आला. कांगारूंच्या मा-यापुढे प्रोटीस संघाने लोटांगण घातले, ज्यामुळे त्यांचा डाव 212 धावांत संपुष्टात आला. डेव्हिड मिलर खेळला नसता तर आफ्रिकेला तेवढ्याही धावा करता आल्या नसत्या. ऑस्ट्रेलियन गोलंदाज मिचेल स्टार्क व जोश हेझलवूड यांनी पहिल्या 13 षटकांत दक्षिण आफ्रिकेला 4 धक्के दिले. स्टार्क व हेझलवूड यांच्या भेदक माऱ्यासमोर आफ्रिकेची मजबूत फलंदाजांची फळी ढेपाळली. डेव्हिड मिलर आणि हेन्रीच क्लासेन यांनी 95 धावांची भागीदारी करून संघाला सुस्थितीत आणले. या दोघांसमोर प्रमुख गोलंदाज अपयशी ठरत असताना पार्ट टाईम गोलंदाज ट्रॅव्हिस हेडने कमाल केली. मिलर व कोएत्झी यांची 53 धावांची भागीदारी पॅट कमिन्सने तोडली. कोएत्झी 19 धावांवर झेलबाद झाला; परंतु त्याने डीआरएस घेतला असता तर तो नाबाद राहिला असता.

# गांगुलीने हेरलेला ‘हिरा’ भारताचा ‘हिरो’

## मोहम्मद शमी करायचा स्मशानभूमीत सराव

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयसीसी वनडे विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारताच्या विजयानंतर वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी देशाचा हिरो बनला आहे. बुधवारी (15 नोव्हेंबर) न्यूझीलंड विरुद्ध खेळल्या गेलेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात शमीने एकट्याने सात विकेट्स घेत भारताला नेत्रदीपक विजय मिळवून दिला. वर्ल्डकपमध्ये सर्वाधिक विकेट घेण्याच्या बाबतीत तो अव्वल स्थानावर पोहचला आहे. त्याच्या या लक्षवेधी कामगिरीनंतर प्रत्येकजण शमीच्या आयुष्यातील संघर्ष आणि मेहनतीचे तोंडभरून कौतुक करत आहेत.**

शमीच्या कारकिर्दीत भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार सौरव गांगुलीचा मोठा वाटा आहे. ज्याचा उल्लेख खुद्द शमीने अनेकदा केला आहे. तो उत्तर प्रदेशातील अमरोहा जिल्ह्यातील सहसपूर अलीनगर गावचा रहिवासी आहे. त्याचे वडील शेतकरी होते. त्याला लहानपणापासूनच क्रिकेट खेळण्याची आवड होती. जेव्हा जेव्हा त्याला खेळण्याची संधी मिळायची तेव्हा तो गोलंदाजी करायचा. त्याच्या घराच्या मागे एक स्मशानभूमी आहे, जिथे तो अनेकदा सराव करत असे. त्याकाळात शमीकडे लेदर बॉल घेण्यासाठीही पैसे नव्हते, त्यामुळे तो टेनिस बॉलने सराव करण्यावर भर द्यायचा. शमीने लेदर बॉलने गोलंदाजी करायला सुरुवात केली तेव्हा त्याचे प्रशिक्षक बदर अहमद यांनी त्याला




खूप साथ दिली. स्थानिक स्पर्धेत शमीच्या गोलंदाजीसमोर कोणताही फलंदाज टीकाव धरू शकायचा नाही. गती आणि स्विंगची प्रतिभा असूनही उत्तर प्रदेशच्या ज्युनियर राज्य संघात त्याची निवड झाली नाही. प्रशिक्षक बदर अहमद नाराज झाले. पण त्यांनी आपल्या शिष्याला एक मोलाचा सल्ला दिला, तो म्हणजे प. बंगाल गाठून तेथे क्लब क्रिकेट खेळण्याचा. शमीने ‘आपका हुक्म सर आँखो पर’ म्हणत प्रशिक्षकांच्या सल्ल्यानुसार कोलकाता गाठले. त्याला या निर्णयाचे फळ मिळाले. त्याच्या प्रयत्नांची कोलकातामध्ये प्रशंसा झाली आणि त्याने ज्युनियर रॅंकमध्ये एन्ट्री घेतली. त्याची कामगिरी पाहून बंगाल रणजी संघात त्याला घेण्याची चर्चा रंगली. शमीला प्रशिक्षण शिबिरात बोलावण्यात आले आणि बंगाल संघातील काही वरिष्ठ क्रिकेटपटूंना नेटमध्ये गोलंदाजी करण्यास सांगितले. यावेळी नेटमध्ये फलंदाजीसाठी समोर होता तो भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुली. या दिग्गज डावखु-या फलंदाजाला गोलंदाजी करण्याचे दडपण शमीवर होते. पण त्याने लक्षवेधी मारा करून गांगुलीलाही प्रभावित केले. गांगुलीची नजर नेहमीच प्रतिभावान खेळाडूंवर असते. नेटमध्ये तरुण शमीच्या वेगवान मा-याचा सामना केल्यानंतर, भारताच्या माजी कर्णधाराने ताबडतोब व्यवस्थापन संघाला शमीकडे विशेष लक्ष आणि त्याच्या खेळासाठी सर्वतोपरी पाठिंबा देण्याची सूचना केली.

### सौरव गांगुली प्रभावित

शमीने ‘आपका हुक्म सर आँखो पर’ म्हणत प्रशिक्षकांच्या सल्ल्यानुसार कोलकाता गाठले. त्याला या निर्णयाचे फळ मिळाले. त्याच्या प्रयत्नांची कोलकातामध्ये प्रशंसा झाली आणि त्याने ज्युनियर रॅंकमध्ये एन्ट्री घेतली. त्याची कामगिरी पाहून बंगाल रणजी संघात त्याला घेण्याची चर्चा रंगली. शमीला प्रशिक्षण शिबिरात बोलावण्यात आले आणि बंगाल संघातील काही वरिष्ठ क्रिकेटपटूंना नेटमध्ये गोलंदाजी करण्यास सांगितले. यावेळी नेटमध्ये फलंदाजीसाठी समोर होता तो भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुली. या दिग्गज डावखु-या फलंदाजाला गोलंदाजी करण्याचे दडपण शमीवर होते. पण त्याने लक्षवेधी मारा करून गांगुलीलाही प्रभावित केले.